|| सा विद्या या विमुक्तये ||

Yuvak Vikas Mandal's

# Arts, Commerce, Science college, Bhalavali.

***Affiliated to University of Mumbai***

Tal- Rajapur, Dist.-Ratnagiri, Pin-416707.

**************************************************************************************************

# माहिती पुस्तिका

# शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६

**अधिक माहितीसाठी QR कोड स्कॅन करा.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| १.प्र.प्राचार्यांचे मनोगत | ४ |
| २.संस्था परिचय, महाविद्यालय परिचय | ५ |
| ३.विद्यार्थ्याची वैयक्तिक माहिती | ६ |
| ४.प्रवेश प्रक्रिया/ ऑनलाईन प्रवेश लिंक | ७ |
| ५.शैक्षणिक अभ्यासक्रम | ७ |
| ६.परीक्षा व मुल्यमापन | १० |
| ७.पालक सभा | ११ |
| ८.महाविद्यालयाची शिस्त | ११ |
| ९.उपस्थिती | ११ |
| १०.रॅगिंग प्रतिबंधक नियम | ११ |
| ११.महाविद्यालयातील विविध विभाग व उपक्रम | १३ |
| १२.नोंदी | १४ |
| १३.फी स्ट्रक्चर | १६ |
| १४.वेळापत्रक | १७ |
| १५.कामकाजाच्या वेळा | १८ |

**प्राचार्यांचे मनोगत**

युवक विकास मंडळ संचलित कला,वाणिज्य,विज्ञान महाविद्यालय भालावली हे जुलै २०१२ मध्ये सुरु करण्यात आले. या महाविद्यालयाला याच वर्षी 'महाराष्ट्र शासन' व 'मुंबई विद्यापीठ' यांची मान्यता मिळाली. हे महाविद्यालय गेली १० वर्ष विनाअनुदानित तत्वावर सुरु आहे. महाविद्यालय लवकरच नवीन सुसज्ज इमारतीत स्थलांतरित होत आहे. महाविद्यालयात सध्या प्रथम,द्वितीय आणि तृतीय वर्ष कला व वाणिज्य हे अभ्यासक्रम सुरु आहेत. लवकरच सायन्स् व कंम्प्युटर सायन्स् या दोन्ही विद्याशाखा सुरु करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. महाविद्यालयात शिक्षणाबरोबरच अभ्यासक्रम पूरक आणि अभ्यासक्रम बाह्य उपक्रम सुद्धा राबवले जातात. त्या योगे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना आणि कौशल्यांना वाव मिळतो. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सातत्याने व तळमळीने महाविद्यालयाचे कामकाज आणि कार्यक्रम गुणवत्तापूर्ण व दर्जेदार व्हावे या करिता अथक परिश्रम करीत असतात.

आपण ह्या महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर महाविद्यालयाकडून मिळणारे शिक्षण व उपक्रम हे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण असतील त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची प्रगती, सर्वांगीण विकास यावर जास्तीत जास्त भर दिला जाईल अशी महाविद्यालयाचा प्रभारी प्राचार्य म्हणून मी हमी देतो.

प्र.प्राचार्य

चंद्रशेखर अरविंद नामजोशी.

## संस्था परिचय

'युवक विकास मंडळ' भालावली ही संस्था रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील मौजे भालावली या गावी १९८४ या वर्षी स्थापन करण्यात आली. १९८४ साली कै.पंढरीनाथ अनंत बागाव (बागाव मामा) आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नातून 'ज्ञानविकास सहकारी हायस्कुल, भालावली' ची स्थापना करण्यात आली. या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून जुलै २०१२ मध्ये मौजे भालावली (धारतळे) या ठिकाणी युवक विकास मंडळ भालावली संचलित कला,वाणिज्य,विज्ञान महाविद्यालय सुरु करण्यात आले.

## महाविद्यालय परिचय

भालावली परिसरात शिक्षण क्षेत्राचा विकास होणे गरजेचे असल्याने, भालावली परिसरातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन उच्च शिक्षणासाठी दूर जावे लागत असल्याने विद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय दूर करण्यासाठी युवक विकास मंडळ भालावली या संस्थेने पुढाकार घेऊन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला. मा.श्री. नारायण केळकर साहेब (मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव यांचे निवृत्त स्वीय सहाय्यक) यांच्या मार्गदर्शनाने व श्री. श्रीकांत बागाव यांच्या प्रयत्नातून जूलै २०१२ या वर्षी कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय मौजे भालावली ( धारतळे ) या ठिकाणी सुरु झाले.

महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासन यांची मान्यता जूलै २०१२ ला मिळाली आहे. सध्या महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष / द्वितीय वर्ष / तृतीय वर्ष कला व वाणिज्य या शाखांसाठी पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश दिला जातो. लवकरच महाविद्यालय नवीन सुसज्ज इमारतीत स्थलांतरित होणार आहे.

PHOTO

# PERSONAL PROFILE OF STUDENT

Name: ______________________________________

Class: ___________________Div.__________ Roll No: ____Date of Birth: ____/____/_____

PRN No: ________________

Address: _____________________________________

Pin Code: ________ E-mail: ________________________

Contact No: 1) _____________________2) __________________ (R) ______________ Blood Group: _____

**(Extension and Other Activities): -** SPORTS/CULTURAL /Any other activity (specify)_____

**Parents Information**

Name: ____________________________________________
Occupation: __________________________________________
Address: ____________________________________________
Contact No(R) ________________(O) ______________________

## Local Guardians name and Contact Phone No: -

Name:-___________________________________________
Address: -__________________________________________
Contact No: - (R) _________________ (O) ________________

Signature of student Signature of guardian Signature of H.O.D. Signature of vice principal

## प्रवेश प्रक्रिया

***विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्याआधी पुढील लिंक ला क्लिक करून रॅगिंग संबंधीचे प्रतिज्ञापत्र भरून त्याचा संदर्भ क्रमांक नोंद करून ठेवावा.***

***लिंक- https://www.antiragging.in/affidavit_registration_disclaimer.html***

प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रिया बारावीचा निकाल लागल्यानंतर लगेच सुरु होईल. मुंबई विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया संगणकीकृत केलेली असल्यामुळे प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर बिनचूक भरणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचा प्रवेश अर्ज कार्यालयातून घेऊन भरणे आवश्यक आहे. दोन्ही प्रवेश अर्ज आणि आवश्यक सर्व कागदपत्रे, महाविद्यालयाची फी आणि विविध शैक्षणिक सवलतींचा अर्ज इ. बाबी पूर्ण झाल्यावरच प्रवेश निश्चित करण्यात येईल.

## प्रथम वर्ष प्रवेश

प्रथम वर्षासाठी महाविद्यालयात प्रवेश घेताना अर्जासोबत खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. महाविद्यालयाचा प्रवेश अर्ज.
२. मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रत व ई-सुविधा तिकीट.
३. प्रवेश अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे अलिकडील दोन फोटो जोडावे.
४. दहावी आणि बारावीचे मुळ गुणपत्रक आणि एक प्रत.
५. बारावीचा शाळा सोडल्याचा दाखला(लिव्हिंग सर्टिफिकेट) आणि एक प्रत.
६. आधार कार्ड,मतदान कार्ड यांची प्रत.
७. मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला,अधिवास दाखला.
८. शैक्षणिक वर्षात खंड प़डत असल्यास रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र.
९. जर फी सवलत घेत असेल तर इबीसी/पीटीसी/एसएसटीसी/माजी सैनिकपाल्य/ओबीसीइ. पैकी आवश्यक असलेला सवलतीचा अर्ज आणि कागदपत्रे.
१०. मुंबई विद्यापीठाच्या प्रवेशासंदर्भातील नियमांप्रमाणेच प्रवेश दिले जातील. या संदर्भातील माहिती प्रवेश समितीकडे उपलब्ध आहे.
११. अँटी रॅगिंग प्रतिज्ञापत्राची प्रत.
१२. ABC आयडी प्रत.

## द्वितीय/तृतीय वर्ष प्रवेश

द्वितीय/तृतीय वर्षात प्रवेश घेण्यासाठी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१ महाविद्यालयाचा प्रवेश अर्ज.

२ मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रत व ई-सुविधा तिकीट.

३ द्वितीय वर्षासाठी प्रथम वर्षाच्या दोन्ही सत्रांच्या गुणपत्रकांच्या प्रती आणि तृतीय वर्षासाठी प्रथम व द्वितीय वर्षाच्या चारही सत्रांच्या गुणपत्रकांची एक प्रत.

४ प्रवेश अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे अलिकडील दोन फोटो जोडावेत.

५ जर विद्यार्थी अन्य महाविद्यालयातून/विद्यापीठातून आलेला असेल तर मुळ गुणपत्रके व त्यांच्या दोन प्रति,पूर्वीच्या महाविद्यालयाचा नाहरकत दाखला तसेच स्थलांतराचा दाखला (Transfer /Migration Certificate) आवश्यक आहे.

६ जर विद्यार्थी मुंबई विद्यापीठाखेरीज इतर विद्यापीठाचा विद्यार्थी असल्यास मुंबई विद्यापीठाचा पात्रता दाखला.

७ आधार कार्ड,मतदान कार्ड ची प्रत.

८ मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला,अधिवास दाखला.

९ शैक्षणिक वर्षात खंड प़डत असल्यास रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र.

१० जर फी सवलत घेत असेल तर इबीसी/पीटीसी/एसएसटीसी/माजी सैनिक पाल्य/ओबीसी इ. पैकी आवश्यक असलेला सवलतीचा अर्ज आणि कागदपत्रे.

११ मुंबई विद्यापीठाच्या प्रवेशासंदर्भातील नियमांप्रमाणेच प्रवेश दिले जातील. या संदर्भातील माहिती प्रवेश समितीकडे उपलब्ध आहे.

१२ अँटी रॅगिंग प्रतिज्ञापत्राची प्रत.

१३ ABC आयडी प्रत.

## प्रवेश नुतनीकरण

दुसऱ्या सत्राचे प्रारंभी ठरवून दिलेल्या वेळात प्रवेश नुतनीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. पहिल्या सत्रातील उपस्थिती, अभ्यासातील प्रगती, वेळोवेळी केलेल्या नियमांचे पालन व वर्तन इत्यादी गोष्टी समाधानकारक नसल्यास दुसऱ्या सत्राचा प्रवेश नाकारण्यात येईल याची नोंद विद्यार्थ्यांनी व पालकांनी घ्यावी.

## शैक्षणिक अभ्यासक्रम

**(नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विषयांमध्ये बदल होऊ शकतो त्या संदर्भात महाविद्यालयाकडून प्रवेश निश्चिती वेळी कळीत केले जाईल.)**

---

**प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.) : SEMESTER- I & II (PAPER NO.- I)**

**OPTIONAL SUBJECTS :( ANY ONE FROM EACH) (ऐच्छिक विषय -प्रत्येक गटातील कोणताही एक):**

1) MARATHI (मराठी)-PAPER NO. I

2) GEOGRAPHY (भूगोल) - PAPER NO. I
3) POLITICS /PSYCHOLOGY (राज्यशास्त्र /मानसशास्त्र) -PAPER NO. I

**COMPULSORY SUBJECTS :( अनिवार्य विषय):**

4) Vocational Skill Course (VSC), Skill Enhancement Course (SEC)
5) Communication Skills in English (AEC), Foundation of Behavioral Skills, Indian (VEC), Knowledge System Series (Generic) – I(IKS)
3) Marathi (मराठी)

---

**द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.) : SEMESTER- III & IV (PAPER NO. II & III)**

***द्वितीय वर्षा करिता प्रथम वर्षातील ऐच्छिक विषय कायम राहतात.वेगळे विषय निवडता येत नाहीत.**

**COMPULSORY SUBJECTS: (अनिवार्य विषय):**

1) FOUNDATION COURSE (पायाभूत अभ्यास)

**APPLIED COMPONENT (उपयोजित विषय):**

2) ADVERTISING (जाहिरात कला)

**OPTIONAL SUBJECTS (ऐच्छिक विषय):**

3) MARATHI (मराठी)-PAPER NO- II
4) MARATHI (मराठी)-PAPER NO- III
5) GEOGRAPHY (भूगोल)-PAPER NO- II
6) GEOGRAPHY (भूगोल)-PAPER NO- III
7) POLITICS /PSYCHOLOGY (राज्यशास्त्र /मानसशास्त्र) - PAPER NO- II
8) POLITICS /PSYCHOLOGY (राज्यशास्त्र /मानसशास्त्र) - PAPER NO- III

---

**तृतीय वर्ष कला (T.Y.B.A.) : SEMESTER- V & VI (PAPER NO. IV, V, VI)**

***तृतीय वर्षा करिता द्वितीय वर्षातील कोणत्याही दोन ऐच्छिक विषयांचे ३-३ पेपर निवडावे लागतात.**

**OPTIONAL SUBJECTS (ऐच्छिक विषय):**

1) MARATHI (मराठी)-PAPER NO- IV
2) MARATHI (मराठी)-PAPER NO - V
3) MARATHI (मराठी)-PAPER NO - VI
4) ECONOMICS /GEOGRAPHY (अर्थशास्त्र /भूगोल)-PAPER NO - IV
5) ECONOMICS /GEOGRAPHY (अर्थशास्त्र /भूगोल)-PAPER NO - V
6) ECONOMICS /GEOGRAPHY (अर्थशास्त्र /भूगोल)-PAPER NO - VI
7) POLITICS /PSYCHOLOGY (राज्यशास्त्र /मानसशास्त्र)-PAPER NO - IV
8) POLITICS /PSYCHOLOGY (राज्यशास्त्र /मानसशास्त्र)-PAPER NO - V
9) POLITICS /PSYCHOLOGY (राज्यशास्त्र /मानसशास्त्र)-PAPER NO – VI

**प्रथम वर्ष वाणिज्य (F.Y.B.COM.) SEMESTER- I & II**

**COMPULSORY SUBJECTS:**

1) Commerce-I (Introduction to Business)
2) Accountancy & Financial Management-I
3) Fundamentals Of Management -I
4) Open Elective in Accounting Paper-I,
   Open Elective in Accounting Paper-II
5) Vocational Skills in Accounting Paper –
   Vocational Skills in Accounting Paper –II
6) Communication Skills in English (AEC), Foundation of Behavioral Skills, Indian (VEC), Knowledge System Series (Generic) – I(IKS)
7) Cocurricular Activities

---

**द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y.B.COM.) SEMESTER- III & IV**

**COMPULSORY SUBJECTS:**

1) ACCOUNTANCY & FINANCIAL MANAGEMENT
2) FINANCIAL ACCOUNTING AND AUDITING –INTRODUCTION TO MANAGEMENT ACCOUNTING
3) COMMERCE
4) BUSINESS ECONOMICS
5) ADVERTISING
6) FOUNDATION COURSE
7) BUSINESS LAW

---

**तृतीय वर्ष वाणिज्य (T.Y.B.COM.) SEMESTER- V & VI**

**COMPULSORY SUBJECTS:**

1) FINANCIAL ACCOUNTING & AUDITING: FINANCIAL ACCOUNTING
2) FINANCIAL ACCOUNTING & AUDITING: MANAGEMENT ACCOUNTING
3) COMMERCE-(M.H.R.M.)
4) BUSINESS ECONOMICS
5) DIRECT & INDIRECT TAXES
6) PURCHASING & STORE KEEPING

---

# परीक्षा व मूल्यमापन

मुंबई विद्यापीठाच्या नियमानुसार प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांच्या दोन्ही सत्रातील परीक्षा घेतल्या जातात. या संबंधीची सूचना, वेळापत्रक व इतर माहिती वेळोवेळी दिली जाईल.त्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे,फी इ.ची पूर्तता वेळोवेळी करणे बंधनकारक आहे.विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून " CHOICE BASED CREDIT, GRADING AND SEMESTER SYSTEM " लागू करण्यात आली आहे.या पद्धतीत विद्यार्थ्यांना वर्षभर सातत्याने उपस्थित राहणे आवश्यक आहे.त्याचप्रमाणे महाविद्यालयाची फी, प्रकल्प, गृहपाठ, चाचणी परीक्षा, सातत्यपूर्ण मूल्यमापन इ.बाबींची पूर्तता वेळोवेळी करणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे परीक्षा पद्धतीत बदल झाल्यास विद्यार्थ्याला कळीत केले जाईल.

***द्वितीय वर्ष म्हणजेच SEMESTER-III ला प्रवेश मिळण्यासाठी संबंधित विद्यार्थी SEM-I आणि SEM-II या दोन सत्रांपैकी कोणत्याही सत्रात दोनपेक्षा जास्त विषयात अनुतीर्ण नसावा.**

*** तृतीय वर्ष म्हणजेच SEMESTER-V ला प्रवेश मिळण्यासाठी संबंधित विद्यार्थी SEM-I आणि SEM-II किंवा SEM-III आणि SEM-IV या दोन सत्रापैकी कोणत्याही सत्रामध्ये तीन पेक्षा जास्त पेपर्समध्ये अनुतीर्ण नसावा त्याचप्रमाणे कोणत्याही एका वर्षात पूर्ण उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.**

* **नवीन शैक्षणिक धोरणानुसार वरील नियमात बदल झाल्यास त्या संबंधी विद्यार्थ्याला वेळोवेळी कळीत केले जाईल.**

# पालक सभा

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा ज्या वेळी महाविद्यालय आयोजित करेल त्यावेळी सभेला पालकांनी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे पालकांनी प्रत्येक सत्रात किमान एकदा महाविद्यालयाला भेट देऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीविषयी चौकशी करणे आवश्यक आहे.

# महाविद्यालयाची शिस्त

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला महाविद्यालयाने वेळोवेळी घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे लागेल अन्यथा नियमाप्रमाणे कडक कारवाई केली जाईल.

# उपस्थिती

## Ordinances 6086 relating to the attendance for learners

## O._6086: Attendance for learners

Every Bonafide learner shall ordinarily be allowed to keep terms for the given semester in a program of his enrolment, only if he fulfills at least seventy five percent (75%) of the attendance taken as an average of the total number of lectures, practical's, tutorials etc. wherein short and/or long excursions/field visits/study tours organized by the college and supervised by the teachers as envisaged in the syllabus shall be credited to his attendance for the total no of

periods which are otherwise delivered on the material day/s. Further it is mandatory for every learner to have min 50% attendance for each course & average attendance has to be 75%.

*** उच्च शिक्षण संस्थांमध्ये रॅगिंगची दहशत कमी करण्यासाठी विश्वविद्यालय अनुदान आयोग नियमांचा सारांश 2009 ***

*दिनांक ०८/०५/२००९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या दृष्टीकोनातून आणि केंद्र सरकार आणि विद्यापीठाने केलेल्या ठरावाला विचारात घेऊन रॅगिंगच्या संकटावर निर्बंध, निवारण व उच्चाटनास कार्यान्वित करण्याची अनुमती दिली गेली.

*उद्देश: देशातील विद्यापीठे, डीम(मानलेली) विद्यापीठे आणि इतर उच्च शैक्षणिक संस्थातून रॅगिंगच्या सर्व स्वरूपांचे उच्चाटन करण्यासाठी, या नियमनांच्या अंतर्गत रॅगिंगला निर्बंधित करणे, तसेच त्यास घडू देण्यास रोखून व या संदर्भात लागू केलेल्या नियमनांतर्गत व योग्य लागू कायद्यानुसार रॅगिंगमध्ये सामील व्यक्तींना दंडित करणे.

* रॅगिंग कशाने घटीत होते: खालील पैकी एक किंवा अधिक कृत्यांनी रॅगिंग घटीत होते:

A) कोणताही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांचे शब्दांनी बोलून अथवा लिखित स्वरुपात किंवा कृतीद्वारे केलेले कोणतेही वर्तन, ज्याचा परिणाम नवीन विद्यार्थी किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांची थट्टा मस्करी करण्यात किंवा उर्मटपणे वागण्यात होतो.

B) कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्याद्वारे केलेली गुंडगिरी व बेशिस्तीची वागणूक जी कोणत्याही नवीन विद्यार्थी किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांना त्रास, हालअपेष्टा, शारीरिक, मानसिक इजा पोचवते किंवा भीती वाढवते किंवा दहशत निर्माण करण्यास कारणीभूत ठरते किंवा कारण होण्याची शक्यता असते.

C) कोणत्याही विद्यार्थ्याला अशी कृती करायला सांगणे जी तो सर्वसाधारण जीवनात करणार नाही, ज्यामुळे लाज निर्माण होईल किंवा यातना होतील किंवा पेचात पडेल ज्याचा प्रतिकूल परिणाम नवीन विद्यार्थी किंवा कुठल्याही विद्यार्थ्याच्या शरीर किंवा मनावर होईल.

D) कोणत्याही वरिष्ठ विद्यार्थ्याद्वारे केलेले कार्य ज्याने कोणत्याही इतर विद्यार्थी किंवा नवीन विद्यार्थ्याच्या नियमित शैक्षणिक उपक्रमात व्यत्यय येईल, त्यास रोखले जाईल किंवा भंग केले जाईल.

E) एका विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थ्याच्या गटाला नेमून दिलेले शैक्षणिक काम नवीन विद्यार्थी किंवा इतर विद्यार्थ्यांना पूर्ण करावयास सांगून त्यांची पिळवणूक करणे.

F) विद्यार्थ्याद्वारे नवीन विद्यार्थी किंवा इतर विद्यार्थ्यांकडून जोर जबरदस्तीने पैसे वसूल करणे किंवा आर्थिक भार टाकणे.

G) कोणतेही शारीरिक दुरुपयोग, ज्यात त्याच्या सर्व भिन्न प्रकारांचा समावेश आहे: लैंगिक अपशब्द, समलिंगी मारपीट, कपडे उतरविणे, जबरदस्तीने अश्लील आणि कामुक कृत्य करणे, कामुक अंगविक्षेप करणे, ज्याने आरोग्यास किंवा व्यक्तीला कोणतेही शारीरिक नुकसान किंवा इतर कोणताही धोका होणे.

H) नविन किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांना त्रास होईल, भीती वाटेल असे सक्रिय किंवा निष्क्रिय स्वरुपात भाग घेऊन केलेली कोणतीही कृती किंवा अपशब्द बोलणे, ई-मेल, टपालाद्वारे पाठविणे, सार्वजनिकरित्या अपमान करणे, ज्यातुन कामविकृत आनंद मिळविणे किंवा दुसऱ्यांना त्रास देऊन किंवा परपिडक रोमांच मिळविणे यांचा समावेश आहे.

I) कोणत्याही नवीन विद्यार्थ्यांवर एका विद्यार्थ्याद्वारे परपिडक आनंद मिळविण्याच्या उद्देशासह किंवा शिवाय केलेली कोणतीही कृती किंवा सामर्थ्य, प्रभुत्व किंवा श्रेष्ठता दाखविणारी कृती जी नवीन विद्यार्थी किंवा इतर कोणत्याही विद्यार्थ्याच्या मानसिक आरोग्य आणि आत्मविश्वास प्रभावित करेल.

*रॅगिंगच्या घटनेमधील प्रशासकिय कार्यवाही:-रॅगिंगमध्ये दोषी असलेल्या विद्यार्थ्यास संस्था खाली दिलेल्या पध्दतीचे अनुसरण करुन आणि विहीत रितीनुसार शिक्षा करेल.

1) रॅगिंगविरोधी पथकाच्या शिफारसींमध्ये निश्चित केल्या गेलेल्या रॅगिंगच्या प्रत्येक घटनेच्या वास्तवावर आणि रॅगिंगच्या घटनेचा प्रकार आणि गांभीर्य यावर अवलंबुन शिक्षा किंवा अन्य कोणत्याही बाबतीत संस्थेची रॅगिंगविरोधी समिती यथोचित निर्णय घेईल.

2) रॅगिंगविरोधी पथकाने निश्चित केलेल्या दोषाचा प्रकार आणि गांभीर्य यावर अवलंबुन रॅगिंगविरोधी समिती, दोषी आढळणाऱ्यांना, खालीलपैकी एक किंवा जास्त प्रकारच्या शिक्षा ठोठावू शकते. त्या म्हणजे -

A) वर्गामधील उपस्थिती आणि शैक्षणिक विशेषाधिकार यांपासुन निलंबन

b) शिष्यवृत्ती/ अधिछात्र वृत्ती आणि इतर लाभ रोखणे.

C) कोणतीही चाचणी किंवा अन्य मुल्यांकन प्रक्रियेसाठी प्रतिबंध करणे.

D) निकाल रोखणे

E) कोणत्याही क्षेत्रीय, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय भेट, क्रिडासत्र, युवा महोत्सव इ. मध्ये संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यास नकार देणे.

F) वसतिगृहातुन निलंबन.

G) प्रवेश रद्द करणे.

H) 1 ते 4 सत्रांच्या कालावधीकरीता संस्थेतुन काढून टाकणे.

रॅगिंगची कृती करणाऱ्या किंवा त्यास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीची ओळख न पटल्यास, संस्था सामुहिक शिक्षेचा अवलंब करेल.

## महाविद्यालयातील विविध विभाग /उपक्रम

* **मराठी वाङ्मय मंडळ**-विद्यार्थ्यांची वाङ्मयीन अभिरुची वाढवणे आणि त्यांची भाषिक जाणीव समृध्द करणे या उद्देशाने दरवर्षी महाविद्यालयात "मराठी वाङ्मय मंडळ' आणि' वाचक गट' यांची स्थापना करण्यात येते.मराठी वाङ्मय मंडळाद्वारे दि.१४ जानेवारी ते२८ जानेवारी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' व दि.२७ फेब्रुवारी कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात येतो.यानिमित्त वक्तृत्व,निबंध,हस्ताक्षर,काव्य,पोस्टर्स इ.स्पर्धा व सुविचार, बोधकथा, चारोळी, लेख, कविता इ.समृद्ध साहित्याने युक्त भित्तिपत्रकांचे उद्घाटन करण्यात येते. वाचक गटाद्वारे दि.१५ ऑक्टोंबर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात येतो.या निमित्त उत्तम वाचक स्पर्धा, मूक वाचन,प्रकट वाचन केले जाते.मराठी भाषेतील दर्जेदार वाङ्मयाची आणि त्या साहित्यिकांची ओळख करून देणे आणि त्या निमित्त वेगवेगळे उपक्रम, व्याख्याने, स्पर्धा आयोजित करणे, प्रमाण मराठी भाषा संवर्धन करण्याबरोबरच मराठीच्या विविध बोलीभाषा, लिपी यांची ओळख करून देणे मराठी भाषेची स्थित्यंतरे आणि भविष्य या विषयी माहिती करून देणे इ.कार्य मराठी वाङ्मय मंडळाद्वारे केले जाते.

***क्रीडा विभाग-**महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी विद्यार्थिनीच्या क्रीडा विषयक गुणवत्तेला वाव देण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या क्रीडा विभागामार्फत प्रयत्न केले जातात. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागामार्फत वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यात विविध Indoor & Outdoor खेळ घेतले जातात.विविध सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा प्रकारात स्पर्धा घेतल्या जातात.तसेच मुंबई विद्यापीठामार्फत घेतल्या जाणाऱ्या आंतर महाविद्यालयीन (Inter Collegiate) क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते.

***सांस्कृतिक विभाग-** विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कला गुणांचा विकास व्हावा या हेतूने नाविन्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन त्याचप्रमाणे विविध 'डेज' व "कलाविष्कार" महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यात समूहगीत गायन, नृत्य, अभिनय, वक्तृत्व ,वाद-विवाद, निबंध, रांगोळी, पोस्टर मेकिंग, कार्टूनिंग, ऑन दि स्पॉट पेंटींग, कोलाज, मूर्तिकाम, मेहंदी, पाककला इत्यादी स्पर्धा घेतल्या जातात.राष्ट्रीय सण, विविध महान व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी निमित्त विविध कार्यक्रम व स्पर्धाचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे दरवर्षी मुंबई विद्यापीठामार्फत युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते यात विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो.

***समुपदेशन कक्ष -** महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या विविध मानसिक समस्यांवर समुपदेशन करून त्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. चिंता, एकाग्रता, ताण, भीती या सारख्या समस्यांवर समुपदेशन केले जाते. त्याचप्रमाणे विविध व्यक्तिमत्व, बुद्धिमत्ता व इतर मानसशास्त्रीय चाचण्या घेत्याला जातात. त्याचप्रमाणे विविध सॉफ्ट स्किल्स, अभ्यास कौशल्ये, स्मृती तंत्रे, करिअर समुपदेशन ई.विषयी मार्गदर्शन केले जाते.

***स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन-** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा कल ओळखून त्यांना विवध स्पर्धा परीक्षांची माहिती उपलब्ध करून परीक्षेसाठी विविध तज्ञ मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन केले जाते व परीक्षांची तयारी करून घेतली जाते.

***महिला विकास कक्ष-** महिलांच्या समस्यांविषयी विशेषतः लिंगभेदाविषयी सामाजिक जागरूकता निर्माण करून महिलांचा आत्मविश्वास वाढविणे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थीनींना समाजातील विविध पातळीवरील समानता आणि स्वच्छतेचे महत्व अधोरेखित करण्याचे काम महिला विकास कक्ष करतो. ८ मार्चला जागतिक महिलादिन साजरा केला जातो. महाविद्यालयात महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी **अंतर्गत तक्रार निवारण समिती** स्थापन केली जाते. त्याचप्रमाणे **'सखी बॉक्स'** मध्ये महिलांवरील झालेल्या अन्यायाची तक्रार नोंदऊ शकतात. त्या तक्रारीवर अत्यंत गोपनीयतेने कार्यवाही होते.तसेच विद्यार्थीनीसाठी एक स्वतंत्र तक्रार पेटी उपलब्ध आहे.विविध कार्यक्रमाच्या अनुशंघाने विविध व्याख्याने, स्पर्धा, परिसंवाद, विविध जनजागृतीचे कार्यक्रम या विभागा मार्फत होतात.

***ग्रंथालय-** महाविद्यालयातील ग्रंथालयात विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके ई. महाविद्यालयाने नेमून दिलेल्या वेळेत विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होतात. महाविद्यालयात ऑनलाईन संदर्भ सुद्धा वेळोवेळी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जातात.

* **करिअर कट्टा**- महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "करिअर कट्टा" हा उपक्रम राबविला जातो यात IAS आपल्या भेटीला, IPS आपल्या भेटीला, Entrepreneur आपल्या भेटीला या सारखे विवध उपक्रम आणि कोर्सेस उपलब्ध केले जातात.

## नोंदी

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

| | सा विद्या या विमुक्तये | |

Yuvak Vikas Mandal Sanchalit,

# Arts, Commerce, Science college, Bhalavali.

***Affiliated to University of Mumbai***

Tal- Rajapur, Dist.-Ratnagiri, Pin-416707.

---

## Fee structure academic year 2025-26

| Sr. No. | Particulars | FYBA & FYBCOM | SYBA & SYBCOM | TYBA & TYBCOM |
|---|---|---|---|---|
| 1. | Tuition fee | 3000 | 3000 | 3000 |
| 2. | Library fees | 200 | 200 | 200 |
| 3. | Gymkhana fee | 200 | 200 | 200 |
| 4. | Other fee/Extracurricular activity | 250 | 250 | 250 |
| 5. | Enrolment fee | 220 | 0 | 0 |
| 6. | Disaster relief fund | 10 | 10 | 10 |
| 7. | Admission processing | 200 | 200 | 200 |
| 8. | Utility fee | 250 | 250 | 250 |
| 9. | Magazine fee | 100 | 100 | 100 |
| 10. | ID card &library fee | 50 | 50 | 50 |
| 11. | Group insurance fee | 20 | 20 | 20 |
| 12. | Student welfare fund | 50 | 50 | 50 |
| 13. | Development fees | 500 | 500 | 500 |
| 14. | Vice-chancellors fund | 20 | 20 | 20 |
| 15. | University sports & cultural activity | 30 | 30 | 30 |
| 16. | E-Suvidha | 50 | 50 | 50 |
| 17. | E-Charges | 20 | 20 | 20 |
| 18. | NSS Fee | 10 | 10 | 10 |
| 19. | Admission form + Info. brochure | 100 | 100 | 100 |
| | ***Total*** | ***5280*** | ***5060*** | ***5060*** |
| **20.** | **Exam fee (Both Semester)** | **2184*** | **2184*** | **2436*** |

*** कोणत्याही फी मध्ये विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे बदल झाल्यास विद्यार्थ्याला कळीत केले जाईल.**

# -: Time Table :-

**Class-** **Class teacher-**

| Sr. No. | Time | Monday | Tuesday | Wednesday | Thursday | Friday | Saturday |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 08:20 AM To 08:30 AM | **National Anthem & University song** | | | | | |
| 2. | 08:30 AM To 09:20 AM | | | | | | |
| 3. | 09:20 AM To 10:10 AM | | | | | | |
| 4. | 10:10 AM To 11:00 AM | | | | | | |
| 5. | 11:00 AM To 11:10 AM | **Recess** | | | | | |
| 6. | 11:10 AM To 12:00 PM | | | | | | |
| 7. | 12:00 PM To 12:50 PM | | | | | | |
| 8. | 12:50 PM To 01:40 PM | | | | | | |

## कामकाजाच्या वेळा

शैक्षणिक कामकाजाची वेळ सकाळी ०८.२० ते दुपारी ०२.००

कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ०८.३0 ते सायंकाळी ०४.३०

जेवणाची वेळ दुपारी ०१.०० ते ०१.३०.

## संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक

महाविद्यालयाचे कार्यालय-९८८१५७४७२६/ ९४०४०४७८७६

प्राचार्य-९९२२८७९९७८(WhatsApp),९०२२०२४४६२

Website- https://bhalavalicollege.in

Email- artscommercesciencecollagebhal@gmail.com

Principal Email- namjoshica@gmail.com

# आमची वैशिष्ट्ये

- सुसज्ज ग्रंथालय.
- तज्ञ आणि अनुभवी प्राध्यापक वर्ग.
- विविध अभ्यासक्रम पूरक आणि अभ्यासक्रमेत्तर उपक्रम.
- अभ्यासक्रमा व्यतिरिक्त अनेक मोफत ऑनलाईन कोर्सेस.
- फी सुलभ हफ्त्यामध्ये भरण्याची सुविधा.
- शासनाच्या विविध शिष्यवृत्ती.

# विविध अभ्यासक्रम पूरक आणि अभ्यासक्रमेत्तर उपक्रम.
















